"Household work – a wage labour?"
Asha

# घरकाम – एक वेठबिगार ?

घरकाम हे स्त्रियांचेच कर्तव्य आहे, आणि हे सर्वात कनिष्ठ प्रकारचे काम आहे हे दोन्ही समज आपल्यामध्ये अगदी रूढ झालेले आहेत. एका बाजूला घरकामाची पूर्ण जबाबदारी स्त्रीवर टाकली जाते. घर नीटनेटके ठेवणे, नवऱ्याकरिता घरात शान्त आणि आनंदी वातावरण निर्माण करणे, मुलांना चांगले वळण लावणे, हे तिचे प्रमुख काम समजले जाते. ही कामे करण्याची पात्रता तिच्यात स्वभाविकपणे आहेच असे गृहीत धरले जाते. त्याचबरोबर, घरकाम म्हणजे क्षुल्लक काम, कनिष्ठ स्वरूपाचे काम, ज्यात डोके वापरावे लागत नाही असे काम ! बहुतेक पुरुषांना घरात कामाला हात लावणे म्हणजे कमीपणा वाटतो.

घरकामाचा गृहिणीला काही मोबदला तर मिळत नाहीच; शिवाय तिने पहाटेपासून रात्रीपर्यंत कष्ट केले तरी ती नवऱ्यावर 'अवलंबून' आहे असेच म्हणतात. तिचा नवरा पण तिने केलेल्या कामावर अवलंबून आहे हे तिच्यासुद्धा लक्षात येत नाही.

## नवी जाणीव

आपण करतो ते काम समाजासाठी आवश्यक आहे ह्याची जाणीव आजकाल नव्यानेच स्त्रियांना व्हायला लागली आहे. कारण स्वयंपाक करणे, भांडी घासणे, कपडे धुणे, घर झाडणे इत्यादी इत्यादी... कामे कुठेतरी, कोणीतरी केलीच पाहिजेत. पाश्चात्त्य देशातील स्त्री-मुक्ती चळवळीमध्ये गेल्या ५-६ वर्षात ह्या प्रश्नाची बरीच चर्चा झाली आहे. आम्ही घरातले काम करतो त्याचे सामाजिक-आर्थिक मूल्य मानले पाहिजे अशी मागणी स्त्रियांनी अनेक प्रकारे केली.

ह्याचे एक उदाहरण म्हणून १९७६ साली इंग्लंडमध्ये स्त्रियांनी केलेल्या एका मागणीचा विचार करू. घरकामाचे आर्थिक महत्त्व काय आहे हे समजण्यासाठी ह्याची मदत होईल.

## स्त्री परावलंबी कशी ?

इंग्लंड एक भांडवलशाही देश आहे. ह्याचा अर्थ जवळजवळ सर्वच उत्पादन तिथे नफ्यासाठी केले जाते. शिवाय तो एक प्रगत भांडवलशाही देश आहे. ३०० वर्षापासून नफ्याच्या दृष्टीने उत्पादन तिथे केले गेले आहे. आज तेथील कंपन्यांचा आकार फार मोठा झालेला आहे. कोळसा, पोलाद, वीज, आणि काही उपभोग्य वस्तूंच्या बाबतीत देशातील सर्व उत्पादन ३-४ कंपन्यांमधून होते. ह्या कंपन्यांचे नफेही प्रचंड असतात. आणि ह्या कंपन्या फक्त एकाच देशामध्ये चालत नसतात. भारतासारख्या अप्रगत देशामध्ये त्यांच्या शाखांतून आणखी नफे येत असतात. अप्रगत देशांमध्ये मजुरांना कमी पगार देऊन नफे वाढविता येतात. ह्या प्रचंड नफा करणाऱ्या प्रचंड कंपन्यांना मग आपल्या देशातील कामगारांना बऱ्यापैकी पगार देणे परवडते. ह्याचे दोन फायदे होतात. देशातील कामगारवर्गाला काही सुखसोयी दिल्या म्हणजे तो बंड करील ही भीती कमी होते. आणि नफ्यासाठी जे उत्पादन केले जाते ते विकल्या शिवाय कंपन्या चालणार नाहीत ! बऱ्यापैकी पगार मिळणारे कामगार ग्राहक म्हणून भांडवलदारांना नफे करण्यास मदत करतात.

ही ग्राहकांची मागणी कमी झाली तर ह्या सबंध अर्थरचनेवर आपत्तीची वेळ येते. लोक वस्तू घ्यायला तयार नसले, किंवा त्यांच्या हातात कमी पैसे असले, तर कारखान्यामध्ये केलेले उत्पादन कोठारांत पडून राहते. उत्पादन करणे कंपनीला परवडेनासे होते. कामगारांना कमी करण्यात येते. मग बेकार काम-

गारांची संख्या वाढली तर लोकांच्या हातातील पैसे आणखी कमी होतात. मग ग्राहकांची मागणी आणखी मंदावते. आणि एक दुष्टचक्र सुरू होते, ज्याला म्हणतात आर्थिक मंदी.

१९३० च्या समारास सर्व पाश्चात्य देशांना अशा प्रकारच्या मंदीचा अनुभव आला होता. म्हणून १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपल्यावर ह्या देशात 'कल्याणकारी राज्याची' स्थापना झाली. ह्यामध्ये कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या अडचणींचा थोडाफार विचार शासनातर्फे सवलती देऊन केला जातो. एका योजनेखाली शासनामार्फत 'बेकारी भत्ता' देण्यात येतो. ही रक्कम खर्च केली जाते आणि त्यातून मागणी निर्माण होते. म्हणजे मंदी टाळणे काही काळ तरी शक्य होते. ज्या कामगारांना कमी पगार मिळतो, त्यांना कंपनी कमीच पगार देत राहते. पण त्याला मदत म्हणून 'कुटुंब भत्ता' त्याच्या मिळकतीवर आणि मुलांच्या संख्येवर ठरविला जातो. म्हणजे प्रत्येक कारखान्याचा मालक एकूण नफा वाढविण्याकडे लक्ष देऊ शकतो, कामगारांना कमी पगार देऊ शकतो; पण शासन सर्व मालकांचा विचार करून, मंदी टाळण्याच्या दृष्टीने कामगारांच्या पगारात भर घालत असते.

हा 'कुटुंब भत्ता' दर आठवड्याला ऑफिसवरून आणावा लागतो. साधारणतः हे काम घरातील बाई करते. कुटुंबाचा खर्च सांभाळणे तिचेच काम असते, आणि ती ह्या रकमेवर अवलंबून असते. पैं पैशासाठी नवऱ्याकडे विचारायला जावे लागत नाही. म्हणून ज्या गृहिणींना स्वतंत्र काहीच उत्पन्न नसते, त्यांना ह्या 'कुटुंब भत्त्याचे' महत्त्व मोठे वाटते.

१९७३ साली सरकारने योजलेल्या एका कायद्यात हा 'कुटुंब भत्ता' अशा प्रकारे वेगळी रक्कम म्हणून देण्याची पद्धत रद्द करून ती रक्कम मिळवत्या पुरुषाच्या पगारात सामील करण्याची सूचना केली होती. तेथील काही स्त्रियांनी ह्या बदलाला संघटितरीत्या विरोध केला. आपला विरोध व्यक्त करण्यासाठी ठिकठिकाणच्या नायकांनी निदर्शने केली, निवेदने काढली. हा बदल त्यांना बराच महत्त्वाचा वाटत होता. कारण त्यांना स्वतंत्ररीत्या मिळणारे एकमेव उत्पन्न त्यांच्या हातून काढले जात होते. शेवटी सरकारने ही योजना रद्द केली. सरकारच्या दृष्टीने ही स्त्रियांची मागणी पूर्ण करणे फारसे कठीण नव्हते.

पण ह्या निषेधाच्या प्रयत्नांतून एक महत्त्वाचा विषय निर्माण झाला. स्त्रिया म्हणायला लागल्या, "आम्ही कुटुंब सांभाळण्याची, घर चालविण्याची पूर्ण जबाबदारी घेत असतो. मग अशा प्रकारे पैशाकरिता दरवेळी नवऱ्याकडे धावायला लागते हे किती अपमानकारक आहे. आम्ही घरकाम केले नाही तर रोज हा पुरुष कारखान्यात काम कसा करू शकेल ? त्याला जेवायला घालणे, त्याचे कपडे धुणे, करायला पाहिजे ना ? शिवाय आम्ही केलेल्या श्रमाशिवाय मुले कशी मोठी होतील ? पुढच्या पिढीत तेच कामगार होणार आहेत. मग ह्या सर्व या श्रमाचा कुठेच उल्लेख कसा काय होत नाही ? आम्ही कष्ट करतो तरी आम्हांला 'परावलंबी' कसे काय म्हणतात ? "

हे सगळे प्रश्न अगदी योग्य आणि महत्त्वाचे आहेत. खरोखरच गृहिणीच्या श्रमांमुळे तिचा नवरा रोज ऑफिसात किंवा कारखान्यात कामाला जाऊ शकतो. आणि काम करणाऱ्यांची नवीन पिढी तयार करण्यात पण तिचा हात असतो.

## पैशाच्या दुनियेत घरकामाचा अपवाद

इंग्लंडसारख्या अर्थव्यवस्थेत प्रत्येक गोष्टीचे देवाणघेवाण पैशाच्या माध्यमातून होते. फॅक्टरीतील, ऑफिसातील काम करणाऱ्याच्या श्रमाचीदेखील खरेदी-विक्री होते. पैशाचा स्पर्श न झालेले क्षेत्र आता जवळ जवळ कुठेच राहिलेले नाही. धर्माच्या क्षेत्रात. शिक्षणाच्या क्षेत्रात, वैद्यकीय क्षेत्रात, पैशाशिवाय काही चालत नाही. कुटुंबातील मुले-मुली १८ वर्षांची झाल्यानंतर आई-वडिलांच्या घरात राहिली तर चालू घरभाड्याच्या प्रमाणात भाडे देतात. माणसामाणसांच्या प्रत्येक व्यवहारात पैसे आहेतच. अशा प्रकारे पाहिले तर घरकाम म्हणजे एक ठळक स्वरूपाचा अपवाद म्हणून दिसून येतो. घरकामाला आर्थिक मोबदला मिळत नाही. हे एकमेव काम जे 'कर्तव्याच्या', 'प्रेमाच्या' भावनेने केले जाणे अपेक्षित असते.

ह्याचा परिणाम काय होतो ? एक तर प्रत्येक

[illegible]णी—म्हणजे समाजातील बहुसंख्य बायका परावलंबी [illegible]तात आणि स्वतःला हीन, पुरुषापेक्षा कमी समज[illegible]त. दुकानात जाऊन वस्तू विकत घेण्याशिवाय बाह्य [illegible]शी त्यांचा काही संबंध येत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे घरकामाच्या पद्धतीवर पण ह्याचा परिणाम होतो. भांडवलशाही अर्थरचनेमध्ये तांत्रिक प्रगती अपरिहार्य झालेली आहे. पण इतर क्षेत्रांमध्ये उत्पादन-पद्धती ज्या प्रमाणात बदलल्या आहेत, त्याच्या मानाने घरकाम अजून अत्यंत अकार्यक्षम पद्धतीने केले जाते. इंग्लंडमध्ये गृहिणीला काही विशिष्ट कामे करण्यासाठी यंत्रसामग्री उपलब्ध झाली आहे हे खरे, पण बाईला विचारले तर दिवसभर कामाचा बोजा होता तो आहेच.

## ह्या रगाड्यातून सुटका कशी होणार ?

ह्या कंटाळवाण्या चक्रातून स्त्रीची कशी सुटका होईल ? तिचे परावलंबित्व कसे नष्ट होईल ? ह्यासाठी दोन परस्परावलंबी गोष्टी करायला पाहिजेत. (१) स्त्रीला पुरुषाबरोबरच उत्पादक कामामध्ये भाग घेण्याचा हक्क मिळाला पाहिजे. हे 'स्त्रीचे काम' आणि हे 'पुरुषाचे काम' हे खोटे भेद करणे बंद झाले पाहिजे. (२) घरकामाचे खाजगी स्वरूप नष्ट झाले पाहिजे. जोपर्यंत प्रत्येक घरकुलात तेच ते घरकाम प्रत्येक बाईकडून केले जाते तोपर्यंत कितीही आधुनिक यंत्रे घरात आणली तरी घरकामाचा बोजा राहतोच. उत्पादनाच्या इतर क्षेत्रात तांत्रिक प्रगतीच्या जोरावर सुसंघटित व मोठ्या प्रमाणावरील उत्पादन होत आहे. घरकामालाही सामाजिक स्वरूप दिल्याशिवाय ते कार्यक्षम होणार नाही. उदाहरणार्थ, साधारण माणसाला परवडणाऱ्या खाणावळी, लाँड्र्या, पाळणाघरे चालवली तर गृहिणीवरचा बोजा खरोखर कमी होईल. आणि मग त्या पुरुषांच्या बरोबरीने इतर कामे करण्यास मोकळ्या होतील.

आजच्या समाजात ह्या गोष्टी घडणे शक्य नाही. घरकामाचे खाजगी स्वरूप कायम ठेवणे, आजच्या संपत्तीधारी वर्गाला सोईस्कर आहे. घरकामाचे महत्त्व टिकविल्याने हरतऱ्हेची उपकरणी, भांडी, शोभेच्या वस्तू इत्यादींची घराघरातून येणारी मागणी उद्योगांच्या चलतीसाठी पोषक ठरते.

पाश्चात्य देशातील स्त्रियांना आता हळूहळू समजायला लागले आहे की घरकामाच्या ह्या खाजगी आणि मागासलेल्या स्वरूपामुळे त्या स्वतः समाजात कमी लेखल्या जातात. घरकामाचे स्वरूप बदलल्याशिवाय म्हणजे त्याचे समाजीकरण केल्याशिवाय बायकांना ह्या स्थितीतून बाहेर पडणे कठीण आहे.

## भारतातील स्त्रियांची वैचारीक गुलामी

भारतामध्ये तर घरकामाचा बोजा याहीपेक्षा जास्त बायकांवर टाकला जातो. 'गृहिणीचे कर्तव्य' हे पवित्र आहे, ज्या बाईला घरकामाची हौस नाही तिच्यात स्त्रीचे गुण कमी आहेत हे रोज ऐकायला मिळणारे उद्गार आहेत. मध्यम वर्गातील स्त्री आणि कष्टकरी वर्गातील स्त्री दोघी घरकामाला पूर्णपणे बांधलेल्या आहेत. फक्त शारीरिक दृष्ट्याच बांधलेल्या नाहीत; त्यांच्या मनात हे विचार आता रूढ झाले आहेत. मध्यमवर्गीय स्त्रीला जरी घरात काम करायला नोकर मिळत असले, तरी तिने नवीन प्रकारे घर सजवून, घराची शोभा, कुटुंबाचा आराम जास्त वाढू शकेल अशी कामे करावीत हे अपेक्षित असते. भरतकाम, फ्लॉवर अरेंजमेंट सारखे नवीन उद्योग तिने शिकावेत अशी अपेक्षा असते. ह्याचा मुख्य हेतू इतर गृहिणींशी स्पर्धा करून आपण त्यांच्यापेक्षा चांगल्या गृहिणी आहोत, आपण नवऱ्याला चांगल्या प्रकारे शोभून दिसतो हे दाखविणे हा होय. गरीब परिस्थितील, कष्ट करणाऱ्यांमधील बाईचे सगळे श्रम आणि वेळ घरकामात जातात, पण वेगळ्या कारणाने. कामगार किंवा शेतमजुरांचे वेतन इतके कमी असते, त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी इतक्या कमी सोई असतात, की विहिरीवरून पाणी आणण्यापासून दळण कांडणापर्यंत सर्व कामे त्यांना घरात करावी लागतात.

आणि हे काम कितीही किचकट असो, कितीही निरर्थक असो, पाठीचा कणा मोडणारे असो, हे आपलेच काम आहे आणि दुसऱ्या पद्धतीने करणे शक्यच नाही, अशा विचारांचेही ओझे ह्या बायकांच्या डोक्यावर असते. घरकामाचे समाजाला काहीतरी महत्त्व आहे, म्हणून घरकाम करणाऱ्यांचे हक्कही समाजाने मान्य केले पाहिजेत, ही जाणीव अजून भारतीय गृहिणीला झालेली नाही. भारतातील घरकाम करणाऱ्या बायकांना ही स्वाभिमानाची जाणीव तरी आल्याशिवाय काहीच बदल होणे शक्य नाही. ह्या दृष्टीने इंग्लंडचा अनुभव जरी एका परदेशी प्रगत देशाचा असला, तरी आपल्याला विचार करण्यासारखा आहे. —आशा